| | | | | |
|---|---|---|---|---|
| CNR No.MHPU010012902026 | दाखल दिनांक | २३/०१/२०२६ | | |
| | नोंदणी दिनांक | ०९/०२/२०२६ | | |
| | निकाल दिनांक | १७/०८/२०२६ | | |
| | कालावधी | वर्षे | महिने | दिवस |
| | | ०० | ०६ | ०८ |

# विशेष न्यायाधीश (पोक्सो कायद्याअंतर्गत) व अतिरिक्त सत्र न्यायाधीश २२ , पुणे यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी सा. र. अग्रवाल)

## विशेष खटला क्र. १३१/२०२६ निशाणी क्र. ०९

विमानतळ पोलीस स्टेशन, पुणे येथील गुन्हा क्र. ४५०/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ६४, ११५, ३५१ व ३५२.

| | |
|---|---|
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस स्टेशन अधिकारी,<br>विमानतळ पोलिस स्टेशन, पुणे |
| सरकार पक्षातर्फे विशेष सरकारी अभियोक्ता | श्री नितीन कोंघे |
| आरोपी | जुनेद जहॉगीर शेख<br>वय – २५ वर्षे,<br>व्यवसाय – खाजगी नोकरी<br>रा. – चंदन नगर, पुणे |
| आरोपी तर्फे विधीज्ञ | पी. एम. कळमकर |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | फेब्रुवारी २०२४ ते १३/०९/२०२५ |
| प्रथम खबर दिनांक | १५/०९/२०२५ |
| दोषारोप पत्र दिनांक | ११/१२/२०२५ |
| दोषारोप पत्र निश्चित केल्याचा दिनांक | ११/०६/२०२६ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | ०५/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी ठेवल्याचा दिनांक | १७/०८/२०२६ |
| न्यायनिर्णय पारीत केल्याचा दिनांक | १७/०८/२०२६ |

शिक्षा आदेशाचा दिनांक (असल्यास) --

**आरोपीचा संपुर्ण तपशील**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनवर मुक्त झाल्याची तारीख | कलम | आरोपी दोषमुक्त झाला किंवा शिक्षा झाली | सुनावण्यात आलेली शिक्षा | फौ. प्र. संहिता कलम ४२८ अन्वये आरोपीचा खटल्याचे वेळी तुरुंगात राहिल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जुनेद जहॉगीर शेख | १६/०९/२०२५ | ०३/११/२०२५ | भारतीय न्याय संहिता कलम ६४, ११५, ३५१ व ३५२. | दोषमुक्त केले | -- | -- |

## अ. अभियोग पक्ष :

| सा.क्र. | निशाणी क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी / पोलीस साक्षीदार/ तज्ञ साक्षीदार/ वैद्यकिय साक्षीदार / पंच) |
|---|---|---|---|
| १ | ६ | पिडीता/ फिर्यादी | फिर्यादी |

## ब. बचाव पक्षाचे साक्षीदार, (असल्यास) :

| | नाव | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्षदर्शी, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## क. न्यायालयीन साक्षीदार (असल्यास) :

| | नाव | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्षदर्शी, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## सरकारी पक्षाचे (बचाव पक्षाचे / न्यायालयाचे पुरावे / निशाणी

## अ अभियोग पक्ष .

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १ | पी.१ | फिर्याद |

## ब. बचाव पक्ष (बचाव पक्षाने मान्य केल्यानुसार) :

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १ | ०७ | घटनास्थळ पंचनामा |
| २ | ०८ | वैद्यकिय अहवाल |

## क. न्यायालयीन निशाणी

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | ४ | दोषारोप |
| २. | ५ | निवेदन |

## ड. जप्त मुद्देमाल :

| अ.क्र. | जप्त मुद्देमाल क्र. | वर्णन |
|---|---|---|
| | -- | -- |

# न्यायनिर्णय
## (पारीत दिनांक १७/०८/२०२६)

आरोपीच्या विरुदध् भारतीय न्याय संहिता कलम ६४ (१), (२) (एम), ११५(२), ३५१(२)(३) व ३५२ अन्वये दंडनीय अपराधाबदद्ल आरोप ठेवून खटला चालविण्यात आला आहे.

२. **या खटल्याची हकीकत थोडक्यात अशी की**, पिडीता वय ३० वर्षे ही तिच्या पतीसोबत लोहगाव, पुणे येथे राहते आणि आय.टी. कंपनीत नोकरी करते. पिडीतेची ओळख फेब्रुवारी २०२४ मध्ये तिच्या ऑफीसमध्ये काम करणारा मुलगा नामे आरोपी जुनेद शेख सोबत झाली. त्याने काही दिवसांनी पिडीतेशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला असता तिने त्याला सांगितले की, तिचे लग्न झालेले असून ती त्याच्यासोबत मैत्री करु शकत नाही. सन २०२४ मध्ये दिवाळीपुर्वी आरोपीने पिडीतेला सांगितले की, त्याला तिच्यासोबत बोलायचे आहे, त्यामुळे ती त्यास विमाननगर, पुणे येथे भेटली. तेव्हा त्याने तिला सांगितले की, आपण कोठेतरी एकांतामध्ये जाउन गप्पा करु. त्यामुळे ते दोघेही पिडीतेच्या फलॅटमध्ये गेले. आरोपीने तेथे पिडीतेच्या इच्छेविरुदध् तिच्याशी शारिरीक संबंध प्रस्थापित केले. त्यानंतर पिडीतेने आरोपीशी संपर्क कमी केल्याने त्याने तिला त्यांच्या दोघांमधील संबंध तिच्या पतीला सांगण्याची भिती दर्शविली. त्यामुळे ते दोघेही एकमेकांशी बोलत राहिले. पिडीतेने मार्च २०२५ मध्ये आरोपीला सांगितले की, ती तिच्या मुळ गावी जात आहे. आरोपीने त्याचा राग मनात ठेवुन तिला शिवीगाळ करुन हाताने मारहाण केली. त्यानंतर दिनांक ११/०९/२०२५ रोजी पिडीता व

आरोपी कामावरुन अर्ध दिवसाची सुटटी घेउन आले असता आरोपीने पिडितेला त्यांच्या संबंधांबाबत पतीला सांगण्याची धमकी दिली व तिला बळजबरीने तिच्या फलॅटवर नेले आणि तिच्या इच्छे विरुदध् तिच्याशी शारिरीक संबंध ठेवले. तसेच आरोपीने पिडीतेला धमकी दिली की, जर तिने कोणालाही याबाबत सांगितले तर तो तिच्या पतीला व कुटुंबियांना खल्लास करेन. त्यामुळे दि. १३/०९/२०२५ रोजी सकाळी ९ वाजता पिडीतेने घरातील बाथरुम साफ करण्याचे हारपिक लिक्वीड प्यायले म्हणुन  तिला त्रास होत असल्याने तिला दवाखान्यात भरती करण्यात आले. करिता, पिडीतेने पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

३. पिडीतेने पोलीस ठाण्याला दिलेल्या वरील फिर्याद वरुन विमानतळ पोलीस ठाणे येथे आरोपीच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ६४ (१), (२)(एम), ११५(२), ३५१(२)(३) व ३५२ अन्वये दंडनीय अपराधाबदद्ल दाखल करण्यात आला. तपासणी अंमलदाराने गुन्हयाच्या तपासादरम्यान घटनास्थळाला भेट देउन घटनास्थळ पंचनामा तयार केला, आरोपीला अटक केली व त्याची व पिडीतेची वैद्यकीय तपासणी करुन घेतली, साक्षीदारांचे जबाब नोंदविले व वैद्यकिय प्रमाणपत्रे हस्तगत केली आणि गुन्हयाच्या तपासाअंती न्यायालयात दोषारोप पत्र् दाखल केले.

४. माझे विद्वान पुर्वाधिकारी यांनी आरोपीच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ६४ (१), (२)(एम), ११५(२), ३५१(२)(३) व ३५२ अन्वये

दंडनीय अपराधाबददृल निशाणी ४ वर आरोप निश्चित केले. आरोपीने गुन्हा नाकबूल करुन खटला संपपरिक्षेस लावण्याची विनंती केली. आरोपीच्या विरुद्ध गुन्हा दर्शविणारा कोणताही पुरावा अभिलेखावर आला नाही. म्हणून त्याचा भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ३५१ अन्वये जबाब नोंदविण्यात आला नाही.

५. खालील मुददे न्यायनिर्णय देण्याकामी विचारार्थ उपस्थित होतात. मी सदर मुददयांचे निष्कर्ष कारणमिमांसेद्वारे खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. फेब्रुवारी २०२४ ते १३/०९/२०२५ या कालावधीत आरोपीने फिर्यादीच्या इच्छेविरुदध् तिच्याशी वारंवार शरिरसंबंध प्रस्थापित केले, असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही |
| २. आरोपीने पिडीतेला स्वेच्छेने मारहाण करुन दुखापत केली, असे अभियोग पक्षाने सिदध् केले काय ? | नाही |
| ३. आरोपीने पिडीतेला व तिच्या कुटुंबियांना जिवे मारण्याची धमकी दिली व फौजदारी पात्र् धाकदडपशाचा अपराध केला, असे अभियोग पक्षाने सिदध् केले काय ? | नाही |
| ४. पिडीतेने एखादा अपराध करावा किंवा शांतताभंग करावी या हेतूने तिला प्रक्षोभीत करण्याच्या उददेशाने आरोपीने तिला जाणीवपुर्वक शिवीगाळ केली, असे अभियोग पक्षाने सिदध् केले काय ? | नाही |
| ५. काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

६. अभियोग पक्षाने आरोपीच्या विरुद्धचे आरोप सिदध् करण्यासाठी सा.क्र. १ पिडीतेची साक्ष निशाणी क्र. ६ वर नोंदविली. तसेच अभियोग पक्षाने घटनेची फिर्याद निशाणी पी–१ वर दाखल केली. अभियोग व बचाव पक्षाच्या विद्वान अभियोक्त्यांचा युक्तिवाद ऐकला.

७. **मुददे क्र. १ ते ४:**– अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे आरोपीने फेब्रुवारी २०२४ ते दि. १३/०९/२०२५ या कालावधीत पिडीतेच्या इच्छे विरुदध तिच्याशी अनेक वेळा शारिरीक संबंध प्रस्थापित केले व तिला व तिच्या कुटुंबियांना जिवे मारण्याची धमकी दिली व तिला शिवीगाळ करुन मारहाण केली. करिता, अभियोग पक्षासाठी सा.क्र. १ पिडीतेची साक्ष आरोपीच्या विरुद्धचे आरोप सिदध् करण्यासाठी अत्यंत महत्वाची आहे. परंतु, पिडीतेने फक्त असे सांगितले की, आरोपी हा तिच्या ऑफीसमध्ये काम करीत होता व कामावरुन त्यांच्यात वाद होत होते. यापुढे तिने सांगितले की, तिला नोकरीवरुन काढुन टाकतील, या भितीमुळे तिने घरी जाउन फिनाईल पिले. यापुढे पिडीतेने सांगितले की, या व्यतिरिक्त काही घडले नाही. तसेच तिने फिर्यादमधील मजकुर देखील नाकारला. अशाप्रकारे पिडीतेने अभियोग पक्षाला समर्थन दिले नाही. म्हणून अभियोग पक्षाच्या विद्वान अभियोक्त्याने पिडीतेची उलट तपासणी घेतली. परंतु, तिने उलट तपासणीमध्ये असे ठामपणे नाकारले की, आरोपीने तिच्या इच्छेविरुध्द तिच्याशी अनेक वेळा शारिरीक संबंध प्रस्थापित केले व तिला व तिच्या कुटुंबियांना जिवे

मारण्याची धमकी दिली व तिला शिवीगाळ करुन मारहाण केली. त्यामुळे पिडीतेची साक्ष अभियोग पक्षाला आरोपीच्या विरुद्धचे आरोप सिदध करण्यासाठी उपयोगाची ठरत नाही.

८. ज्याअर्थी अभियोग पक्षाच्या महत्वपुर्ण साक्षीदार म्हणजे पिडीतेने अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे घटना घडल्याचे नाकारुन अभियोग पक्षाला समर्थन दिले नाही, त्याअर्थी हे न्यायालय या निष्कर्षाप्रत पोहचते की, अभियोग पक्ष हे आरोपीच्या विरुद्धचे आरोप निःसंशयीतपणे सिद्ध करण्यास विफल ठरले. करिता, मी मुददे क्र. १ ते ४ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवितो आणि मुद्दा क्र. ५ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

## <u>आदेश</u>

१ आरोपी जुनेद जहॉगीर शेख यास भारतीय न्याय संहिता कलम ६४ (१), (२)(एम), ११५(२), ३५१(२)(३) व ३५२ अन्वये दंडनीय अपराधातून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २५८ अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२ आरोपीने रक्कम रु. १५,०००/– चा वैयक्तिक जामिन आणि तितक्याच रकमेचा जामिन भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८१ अन्वये दयावा.

एसडी/–

स्थळ – पुणे
दिनांक – १७/०८/२०२६

(सा. र. अग्रवाल )
विशेष न्यायाधीश २२(पोक्सो कायदया अंतर्गत) व अतिरिक्त सत्र न्यायाधीश,पुणे